# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 475 /2020 दिनांक: 05 /06/2020

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 31 मे 2020
5. श्री. दर्शन कमलकिशोर गोयनका व्यवस्थापक, हॉटेल तुषार राष्ट्रीय महामार्ग क्र. 6 खामगांव रोड अकोला यांचे पत्र दिनांक ०५.०६.२०२०

**संस्थात्मक अलगीकरण केंद्रासाठी हॉटेल तुषार इमारतीला परवानगी देणेबाबत.**

## आदेश

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2, 3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे, **आणि**

**ज्याअर्थी,** व्यवस्थापक, हॉटेल तुषार राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ खामगांव रोड अकोला यांनी कोव्हीड-19 चे अनुषंगाने Covid Care Center म्हणून विलगीकरणामध्ये रुग्णांना राहण्याकरिता तुषार हॉटेल उपलब्ध करुन देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे. तसेच सदर हॉटेल मधील खोल्या हया प्रती दिन दराने उपलब्ध करुन देण्यात येतील ज्यात जीएसटी ची रक्कम समाविष्ट असेल. सदर हॉटेल उपलब्ध करुन देतांना सोशल डिस्टंसिंग व आयसीएमआर यांनी दिलेल्या सर्व निर्देशांचे पालन केल्या जाईल व सदर ठिकाणी सुरक्षेकरिता बंदोबस्त, साफसफाई तसेच जेवनाची व्यवस्था स्वतंत्र करण्यात यावी असे त्यांनी संदर्भीय पत्राद्वारे कळविले आहे.

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला**, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , अंतर्गत प्राप्त अधिकारानुसार, कोव्हीड रुग्णांना त्यांचे ईच्छेनुसार अलगीकरण ( Qurarntine ) म्हणून स्वतंत्र राहण्याचे दृष्टीने, हॉटेल तुषार, राष्ट्रीय महामार्ग बाळापुर शेगांव टी पॉईंट जवळ, अकोला येथे शुल्क आकारणी करुन (On Payment Basis) **संस्थात्मक अलगीकरण केंद्र** चालविण्याकरीता खालील अटी व शर्तीचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

1. अलगीकरण केंद्रामध्ये त्यांनी ICMR यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.
2. महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश तसेच मार्गदर्शक सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
3. अलगीकरण केंद्र हे हॉटेल तुषार राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ खामगांव रोड अकोला येथे राहील. त्यामध्ये आवश्यक बेडची व्यवस्था करण्यात यावी. एकाच कुटुंबातील अधिक रुग्ण असल्यास क्षमता वाढविण्यात यावी.
4. या सेंटरमध्ये रुग्णांचे उपचारार्थ लागणारा पुरेशा प्रमाणातील तज्ञ डॉक्टर व कर्मचारी / अधिकारी वर्ग 24 X 7 नियमीतपणे उपस्थित ठेवावा लागेल.

..2..

5. तसेच N-95 मास्क, डिजिटल थर्मामिटर, अत्यावश्यक सेवा ह्या 24 X 7 पुरविणे आवश्यक राहील.
6. अलगीकरण केंद्रामध्ये दाखल केलेल्या रुग्णांना ते घेत असलेल्या सोई सुविधांकरीता नियमानुसार माफक शुल्क आकारण्यांत यावे.
7.

जिल्हादंडाधिकारी अकोला

(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

***प्रतिलिपी -***
1. मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांना माहितीस्तव सादर.
2. जिल्हा शल्य चिकीत्सक अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित
3. अधिष्ठाता, *शासकीय* वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित
4. जिल्हा पोलीस अधीक्षक, *अकोला* यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित
5. *आयुक्त, महानगरपालिका, अकोला* यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित
6. *उपविभागीय अधिकारी, अकोला* यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित
7. **व्यवस्थापक,** हॉटेल तुषार राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ खामगांव रोड अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित

(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
जिल्हादंडाधिकारी,अकोला